विश्ववाणी
समर्पण
Rs. 10/- | Vol. 34 - Issue 6 | June 2021

प्रार्थनेत गूडघे टेकण्याचे महत्व

जून २०२१

विश्ववाणी समर्पण

PUBLICATION OFFICE:
1-10-28/247, Anandapuram, Kushaiguda,
E.C.I.L. P.O., Hyderabad-500062. ✆ 27125557.
samarpan@vishwavani.org

ADMINISTRATIVE OFFICE:
20, Raghul Street, T.M.P. Nagar, Pudur,
Ambattur, Chennai-600053. ✆ 26869200
vishwavaninet@vishwavani.org

STATE OFFICE
G-2, Pradnyakiran Society, Bhawani Nagar,
opp. Prem Auto, Birla College Road,
Kalyan(W), Dist- Thane, Pin- 421301
Contact: 8007377733, 8888318884

दर्शनः

प्रभू येशूच्या गौरवशाली शूभवर्तमानाद्वारे भारतातील खेडी आशिर्वादित होताना पाहणे.

विश्ववाणी समर्पण मासिकः तामीळ, मल्याळम, तेलुगु, कन्नड, मराठी, गुजराती, हिंदी, ओडीया, बंगाली, इंग्लिश, कोकबोरोक, आणि सौरा या भाष्यांमध्ये प्रकाशित केले जाते. वार्षिक देणगी १०० रू.

Emil Annan's

मननाचे मूद्दे...

- जर आम्ही प्रार्थनेत उणे पडलो तर लहान काम सुध्दा डोंगरासमान होईल.
- जर परमेश्वराचे सेवक म्हणाले प्रार्थनेसाठी वेळ नाही तर त्यांची निवड परमेश्वरापासून नाही.
- परूषांची प्रार्थना मोठी आहे, समुदायात केलेली प्रार्थना बहुमूल्य आहे.
- एक मार्ग आहे हया जीवनातील युध्दास तोंड देण्याचे तो म्हणजे प्रभू येशू ख्रिस्ताशी सकाळी भेटणे आहे
- विश्वासणाऱ्यांना प्रार्थनेद्वारे सर्व गोष्टी शक्य आहेत कारण, जो विश्वासणारा आहे त्यासाठी सर्व गोष्टी शक्य आहे.

अनुक्रमणिका

०८... मननाचे मूद्दे
०३... एक्झीक्युटीव्ह डायरेक्टरचे पत्र
०७... नेटवर्क अध्यक्षांकडून
०९... मूख्य आकर्षण
११... स्टेट कॉर्डिनेटरचे पत्र
१२... प्रार्थना
१५... क्षेत्रीय वार्ता

अशा व्यक्तिंसाठी जे प्रार्थना करतात आणि उत्तर मिळवतात.
आणि परमेश्वरावर विसंबून राहुन सामर्थ्याचा अनूभव घेतात.

एक्झीक्यूटीव्ह डायरेक्टर यांजकडून...

एकटे प्रार्थना करा

कारण जे काही तूम्हाला पाहिजे ते ख्रिस्ताला एकटे सांगा.

पूष्कळ प्रार्थना करा

कारण तूमचा प्रभू येशू तूम्हाला पूष्कळ आशिर्वाद देवू इच्छितो.

पूष्कळ प्रार्थना करा, आणि पूष्कळ मिळवा.

रोज! प्रार्थना करा

तूम्ही तूमच्या शरीराची काळजी घेता त्याप्रमाणे तूमच्या आत्म्याची

रोज काळजी घेणे आवश्यक आहे. म्हणून तूम्ही प्रभू येशू कडे पाहा.

तूमचा जीव, आत्मा, शरीर तो आनंदीत करील.

तूम्ही लज्जित होणार नाही.

सेवाकार्यातील सर्व सहभागीदारांना आमच्या तारणाऱ्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या अतुलनीय नावात सलाम. मी माझ्या संपूर्ण हृदयाने परमेश्वराची स्तूती करतो, त्याचे मार्गदर्शनाबद्दल आणि त्याने आमचे रक्षण करून उत्तम आरोग्य दिले यासाठी परमेश्वराने माझ्यासाठी जे सर्व चांगले केले त्याची परतफेड मी कशी करू? तारणाचा प्याला हाती धरून मी परमेश्वराचा धावा करीन.

गूडघे टेकून प्रार्थना करण्याचा खरा उद्देशः

मनूष्यांच्या पायाजवळ वाकण्याची सामान्य रीत आहे. त्याचा अर्थ समर्पण करणे किंवा आदर करणे आहे प्रतिष्ठित उच्च अधिकाऱ्यांपूढे झूकणे ही संस्कृती आहे. जून्या काळी राजांना देवासमान मानत होते. त्याचा आधार मिळवण्यासाठी लोक त्याची आराधना करीत. इब्री भाषेत वर्शिप हया शब्दाचा अर्थ नम्र होणे आणि झूकणे आहे.

पवित्र शास्त्रात, परमेश्वराने अब्राहामाची निवड केली आणि त्याला मूर्ती पूजेपासून वेगळे केले. उत्पत्ती. १२:१-७, अनूवाद ७:५-६ परमेश्वराच्या लोकांनूसार, परमेश्वरासमोर झूकणे आणि गूडघ्यावर येणे हयाचा अर्थ फक्त परमेश्वराचा आदर करणे नाही तर ही परमेश्वराची आराधना करण्याचा मार्ग आहे. उत्पत्ती- १७:२, २४: २६, ४१:४२-४३, २ इतिहास ६:१३, स्तोत्र ९५:१-७, १३८:२, दानिएल ६:१० जून्या काळापासून असे अनेक प्रसंग आहेत लोक प्रार्थनेच्या वेळी गूडघे टेकत. लुक २२:४१-४२ मध्ये येशूने त्याच्या पित्याकडे प्रार्थना केली, हयासाठी की, पित्याची इच्छा जगात पूर्ण व्हावी.

जेव्हा आम्ही आमच्या निर्माण कर्त्यापूढे विनंती करतो आणि दयेसाठी आणि उत्तम आरोग्यासाठी

प्रार्थना करतो. मत्तय १७:१४-१८, मार्क १:४०-४२ तेव्हा त्याला कळवळा येतो आणि तो आमची मदत करतो. परमेश्वरा समान पवित्र कोणी नाही. १ शमूवेल २:२ परमेश्वर जो युगानूयुग जिवंत आहे. प्रकटी. १:१८, प्रकटी ४:८-११, प्रभू येशू लवकर येत आहे. प्रकटी. २२:२० परमेश्वराच्या प्रिय मूलांनो, प्रभू येशूच्या येण्याची प्रतिक्षा करा त्याला भेटण्यासाठी

प्रार्थना करण्याची योग्य वृत्तीः

जो वेळ आम्ही आमच्या निर्माणकर्त्याबरोबर घालवतो हयास परमेश्वराबरोबरचा शांत समय म्हणतात. प्रार्थनेद्वारे आम्ही परमेश्वराच्या संपर्कात येतो. जेव्हा आपण पवित्र वचन वाचतो तेव्हा परमेश्वर आम्हाबरोबर बोलतो. पहाटे आपण उठतो तेव्हा आपले मन शांत असते तो समय परमेश्वराबरोबर बोलण्याचा योग्य समय आहे. स्तोत्र ५:३, ८८:१३,११९:१४७-१४८, यशया ५०:४ आमच्या रोजच्या मननाच्या वेळी आम्हास पवित्र वचन वाचण्याची गरज आहे यासाठी की त्याद्वारे आम्ही स्वतःचे परिक्षण करावे. परमेश्वराच्या वचनाचे मनन करण्याची आम्हास गरज आहे.

आम्ही स्वतःला नम्र करावे, आपल्या पापांची कबूली करावी, पश्चाताप करावा, परमेश्वराने पापांची क्षमा केल्या बद्दल परमेश्वराची स्तूती करावी आणि त्याची आराधना करावी स्तोत्र. १३९:२३-२४, नेहम्या ९:२-३, एज्रा. ९:५-१५, स्तोत्र ५१:१-१० मत्तय ६:९-१३ मध्ये आपण प्रभूची प्रार्थना वाचतो. पहिल्या तिन विनंत्या परमेश्वराशी संबंधीत आहेत. त्याचे नाम त्याचे राज्य त्याची ईच्छा पूढच्या चार विनंत्या आमच्या गरजा संबंधी आहे. अन्न, पाप, मोह, मूक्ती या व्यतिरिक्त आम्ही आमच्या समाजासंबंधी आणि इतरांच्या गरजा संबंधी प्रार्थना केली पाहिजे. ईयोब. ४२:१०, गलती ६:२, १ शमूवेल १२:२३ आपण आपले प्रार्थनेचे जीवन संतूलित करू.

तूमचे जीवन लवकर आरोग्य संपन्न होवोः

स्तोत्र ४:८ सांगते फक्त परमेश्वर आम्हाला सुरक्षित ठेवतो. स्तोत्र १२१ मध्ये ६ वेळा सांगितले आहे, परमेश्वर सर्व अरिष्टांपासून तूझा सांभाळ करील. यशया २७:३ मध्ये त्याची निगा करणारा मी परमेश्वर, मी त्याला घडोघडी पाणी घालतो. त्याला कोणी उपद्रव करू नये म्हणून मी त्याची रात्रंदिवस राखण करितो. ही आमची जबाबदारी आहे जे कोरोनाग्रस्त आहेत, आणि ज्या लोकांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्यांच्यासाठी प्रार्थना करावी. सरकार हया रोगाविरूध्द ज्या सर्व उपाय योजना करत आहे त्या परमेश्वर आशिर्वादित करो.

आमचे सहभागी, आणि विश्वासणाऱ्यांकडून आलेल्या बातम्या ऐकून आम्ही दूःखी होत आहोत. परमेश्वर त्यांना आरोग्य देवो आणि ज्यांनी प्रियजन गमावले आहेत त्यांचे सांत्वन करो. यशया ५८:८ मध्ये सांगितल्याप्रमाणे तूझी जखम लवकर भरेल त्यांना त्याच्या हया वचनाचा अनूभव येवो. मार्क ५:३८, स्तोत्र १२२:७ मध्ये सांगितल्या प्रमाणे त्यांना शांती मिळो आणि त्यांच्या क्लेषापासून त्यांना मूक्ती मिळो.

गरजवंतांसाठी तूमचा वाटा पाठवाः

आम्ही फक्त सुवार्ता सांगत नाही तर हया महामारीच्या उद्रेकाच्या काळात कार्यक्षेत्रातील विश्वासणाऱ्यांना अन्न वाटत आहोत. आत्तापर्यंत ४,२१७ कूटूंबांना हयाचा लाभ झाला आहे. आमच्या समाज विकास केंद्राद्वारे आम्ही शिक्षण, वैद्यकीय मदत आणि आर्थिक दृष्टया मागासलेल्या अन्न पूरवठा करत आहोत. जर तूमची साहाय्य करण्याची इच्छा असेल तर आम्हाबरोबर संपर्क साधा.

येशू ख्रिस्ताने काय सांगितले त्याची आठवण करा. जो माझा शिष्य आहे तो या लहानातील एखादयाला काही मदत करील तर मी तूम्हास खचित सांगतो तो आपल्या बक्षिसास मूकणार नाही.

जर ख्रिस्त तूम्हासाठी मेला, तर तूम्ही त्याच्यासाठी केलेला त्याग काहीच नाही- सी. टी. स्टड

प्रशिक्षण आणि सेवाक्षेत्रातील सेवकः

हया वर्षी जानेवारीत सुरू झालेला सेवकांचा प्रशिक्षण काळ संपला आहे, आणि १९२ सेवकांना मिशन क्षेत्रात पाठवण्यात आले. उत्तर प्रदेशातील २५ नवीन सेवकांचे प्रशिक्षण आणि ओरिसातील २१ नवीन सेवकांचे प्रशिक्षण हया महिन्यात पूर्ण होईल. उत्तर पूर्व भारतातील ५० मिशनरीचे प्रशिक्षण न टाळता येणाऱ्या परिस्थितीमूळे पूढे ढकलण्यात आले आहे. ५० मिशनरींचा समर्पण विधी जो १५ मे ला तूतिकोरीन जिल्हा पाराकाराय येथे योजला होता तो पूढे ढकलण्यात आला आहे. आणि परमेश्वराची इच्छा तर तो डिसेंबर २०२१ पर्यंत करण्यात येईल.

जर तूम्हास पवित्र आत्मा खेडे दत्तक घेण्यासाठी प्रेरणा करत असेल तर तूम्ही ३०००/- रूपये प्रत्येक महिन्याला साहाय्य करू शकता. मिशनरी सेवाकार्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी चला आपण एकत्र काम करू.

पूर्णवेळ काम करणाऱ्या सेवकांचे कल्याणः

गरजू लोकांची काळजी घेण्यासाठी सहकारी संस्था प्रार्थनापूर्वक १ डिसेंबर २०२० ला सेवकांचे कल्याण आणि त्यांचे भविष्य दृष्टीसमोर ठेऊन सूरू करण्यात आली. परमेश्वराने आम्हास मार्गदर्शन केल्याप्रमाणे आम्ही बँक खाते उघडले.

आणि सरकारकडे सहकारी संस्था म्हणून ३/३/२१ ला नोंद केली. मिशनरींच्या कूटूंबांना आजारपणात अपघात आणि मृत्यू हया काळात आम्ही प्रार्थना पूर्वक मदत वाढवत आहोत. हया कार्यासाठी तूम्ही आपली मदत स्वच्छेने वाढवावी अशी आम्ही तूम्हास विनंती करत आहोत .

चला आपण प्रार्थनेत अश्रू ढाळुः

आम्हाला तूमच्या सतत प्रार्थनेची गरज आहे. तूम्ही तूमच्या विभागातील प्रतिनिधींबरोबर प्रार्थनेच्या मूद्यांसाठी संपर्क साधू शकता. आपण आपल्या देशासाठी प्रार्थना करू आणि विजयी होऊ. परमेश्वर तूम्हास आणि तूमच्या हातच्या कामास विपूल आशिर्वाद देवो.

परमेश्वर आम्हावर कृपा करी पर्यंत त्याच्याकडे आमचे डोळे लागलेले असतात. स्तोत्र १२३:२

चेन्नई
१२/५/२०२१

ख्रिस्तात तूमचा
रेव्ह. डब्ल्यु. विल्सन गॅनकूमार
एक्झीक्यूटीव्ह डायरेक्टर

विश्ववाणी प्रार्थना केंद्र

प्रभू येशूने आम्हाला विश्ववाणी द्वारे अजून एक दार उघडून दिले आणि ते म्हणजे विश्ववाणी प्रार्थना केंद्र जे २४ तास चालू राहील. भारतातील ०९ भाषांमध्ये हे कार्यरत असणार आहे. आपल्या प्रार्थना विनंत्या आपण टोल फ्री नंबर वर कॉल करून सांगू शकता.

आपणासाठी आम्ही २४ तास उपलब्ध आहोत.

टोल फ्री नंबर - १८०० २७० ०३३३

२७ नंबर हे स्तोत्र आहे व ३३३ हे यिर्मया ३३:३ वचन आहे. पवित्र आत्म्याद्वारे हया सेवेची आम्ही सूरूवात केली आहे. कृपया हयासाठी आपण प्रार्थनेत आठवण ठेवा.

आपण कधीही आपली प्रार्थना विनंती आपल्या मराठी भाषेमध्ये आम्हाला सांगू शकता.

या टोल फ्री नंबर वर - १८०० २७० ०३३३

स्थानिक विश्वासणाऱ्यांकडून कच्च्या प्रार्थना मंदिराची उभारणी

ज्यांनी त्या प्रभूची चव घेऊ न पाहिली आणि त्याची पापक्षमेची शक्ती अनूभवली त्यांनी त्याचे गौरव केले आणि आराधना केली. त्या विश्वासणाऱ्यांनी स्वतःसाठी एका कच्च्या प्रार्थना मंदीराची उभारणी केली व आराधनेला सुरूवात केली.

मिशिंग लोकगटातील न्यूगान सेवाक्षेत्रातील

Neogaon, Assam

Durgapur, Tripura

आसाम येथील हे प्रार्थना मंदीर दि. ६.३.२०२१ रोजी समर्पित केल्या गेले. तसेच रेंगा लोकगटातील दूर्गापूर सेवाक्षेत्रातील त्रिपूरा येथील कच्चे प्रार्थना मंदीर दि. १४.४.२०२१ रोजी समर्पित करण्यात आले. समर्पणाचा विधी झाला नंतर अनेकांनी पाण्याद्वारे आपल्या विश्वासाची कबूली दिली. ते प्रभूचा शोध करतात ते आनंद करतील.

– आसानंद लिमा

Donate online

Bank : State Bank of India
A/C Name : VISHWA VANI
A/C No. : 34445302072
IFS Code : SBIN0003375
Branch : REBALE T T C- NAVI MUMBAI

कृपया अधिक माहितीकरिता संपर्क साधा-
कल्याण ऑफीस मो. नं. ८००७३७७७३३

नेटवर्क अध्यक्षांकडून...

परमेश्वराची कृपा,कळवळा, शांती प्रिय भाऊ आणि बहिणींना मिळो, जे आपल्या प्रार्थनेद्वारे आणि आर्थिक साहाय्याद्वारे सुवार्ता कार्याच्या वाढीसाठी मदत करत आहेत.

कृपा आणि शांती परमेश्वरापासून आणि प्रभू येशू ख्रिस्तापासून बहीण आणि भावांना मिळो जे सूवार्ता कार्याच्या वाढीसाठी प्रार्थना आणि आर्थिक साहाय्याद्वारे मदत करत आहेत. प्रेषित पौल करिंथकरास लिहितो, सर्व काही साजेल असे व व्यवस्थितपणे होऊ द्या. १ करिंथ १४:४० कोणतेही कार्य, संस्था किंवा मंडळीची वाढ शिस्तीने आणि योग्य रितीने कार्य केल्याशिवाय होत नाही. शिस्तीशिवाय केलेले कोणतेही कार्य मोडकळीस आलेल्या झाडाप्रमाणे आहे. बेशिस्तपणा आमच्या जीवनात कोणतीही प्रगती न होण्याचे कारण आहे. परमेश्वराने आम्हाला शिस्तीत आणि व्यवस्थित जगण्यासाठी पाचारण केले आहे. म्हणून आपण परमेश्वराची प्रतिक्षा केली पाहिजे स्वतःची परिक्षा केली पाहिजे.

आणि अनावश्यक गोष्टी जीवनातून काढल्या पाहिजे. हा जमाव बंदीचा काळ आम्हाला यासाठी दिला आहे आम्ही शूध्द व्हावे आणि आपल्या ध्येयाकडे पोहचण्याच्या मार्गात प्रगती केली पाहिजे. विश्ववाणी सेवा कार्याची वाढ भागीदारांच्या शिस्तीमूळे आणि व्यवस्थितपणामूळे होत आहे. एमिल अन्नन स्टाफ मिटींगमध्ये नेहमी ३, एस. संबंधी सांगत असतात. एस- सिस्टीम, एस- स्टँडर्ड, एस- सूपरविझन त्याचे आम्ही नेहमी अनूसरण केले पाहिजे पहीला एस सिस्टीम संबंधी आहे. जे काही आपण करतो ते आपण पध्दत शीरपणे केले पाहिजे. सेवाकार्याच्या वाढीचे कारण प्रार्थना गटांनी परमेश्वराला केलेल्या समर्पणाद्वारे आहे. फक्त प्रार्थनेद्वारे आपण कठीण परिस्थीतवर विजयी होऊ शकतो. आमचे सर्व प्रार्थना गटांनी तंतोतंत कार्यरत पाहिजे. १ लाख खेडयापर्यंत पोहचण्यासाठी आम्हाला १ लाख प्रार्थना गटांची गरज आहे. हया प्रार्थना गटांनी प्रत्येक आठवडयात १ तास मिशनसाठी आणि आपल्या देशातील लोकांसाठी प्रार्थना करण्याची गरज आहे. प्रार्थना गटांच्या पूढाऱ्यांनी प्रार्थना योध्दांना निश्चित समयी मिशनने मार्गदर्शन केले पाहिजे. अशा प्रार्थनेत सहभागी होण्याची तूमची इच्छा असेल तर कृपा करून विश्ववाणी प्रतिनिधींबरोबर संपर्क साधा. मिशन आणि देश आशिर्वादित होवो.

परमेश्वर तूम्हाला आणि तूमच्या कूटूंबाला आशिर्वादित करो. मिशनच्या उन्नतीसाठी आम्हाला हजारो प्रतिनिधींबद्दल आम्ही परमेश्वराची स्तूती करतो. आमच्या मिशनचा वेग

वाढवण्यासाठी तूम्ही आमच्या बरोबर हात मिळवावे अशी आम्ही तूम्हाला विनंती करतो. जर तूमची इच्छा असेल तर कृपा करून आम्हाबरोबर संपर्क साधा. तूमच्या प्रार्थनांद्वारे राष्ट्र आशिर्वादित होऊ द्या.

हया महामारीच्या काळात प्रार्थनेद्वारे आमचा प्रोमोशनल स्टाफ, प्रार्थना गटांचे प्रमूख, बचत डब्बे धारक, आणि आर्थिक साहाय्य करणारे यांच्या उत्कृष्ट संवाद असावा. आम्ही एकमेकांसाठी प्रार्थना केल्या पाहिजे व एकमेकांना आधार दिला पाहिजे. घेण्याची, प्रमोशनल कार्यकर्त्यांची भेट, विभाग कोऑर्डिनेटरची भेट घेणे यांची परवानगी नाही म्हणून ते गूगल किंवा झूमचा उपयोग करत आहेत. आमच्या मिशनने व्यवस्थित कार्यरत असावे हयासाठी आम्ही आधूनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याचा प्रयत्न करत आहोत.

जेव्हा पौलाने तिमथ्याला लिहीले कोणी अध्यक्ष होण्यास पाहतो तर तो चांगल्या कामाची इच्छा धरितो. १ तिमथी ३:१ निरीक्षण अत्यंत महत्वाचे आहे. चांगल्या अध्यक्षाशिवाय कार्याची प्रगती होऊ शकत नाही. प्रत्येक आम्हाला निरीक्षणाची गरज आहे. मिशनरी कार्य हयाला अपवाद नाही.

आमच्या जीवनात प्रगती होण्यासाठी आणि आमच्या जीवनात आणि जीवनाद्वारे परमेश्वराचे गौरव होण्यासाठी आम्हाला पध्दतशीर जीवन, उच्च दर्जा आणि निरीक्षणाची गरज आहे. आम्ही आपला वेळ कसा व्यतित करतो दर्जा योग्य ठेवण्यासाठी आम्हाला त्यावर नजर ठेवण्याची गरज आहे.

परमेश्वर आम्हाला आमच्या हृदयाची पारख करण्याची आणि परमेश्वराच्या राज्यासाठी नवीन निर्णय घेण्यास साहाय्य करो.

आमच्या राष्ट्राच्या १ लाख खेडयात शांती, आरोग्य, आनंद प्रिती आणि ऐक्य यांची वाढ होवो.

परमेश्वराचे संरक्षण आणि परमेश्वराची कृपा तूम्हास मिळो.

हैद्राबाद
१५/०५/२०२१

परमेश्वराच्या सेवेत तूमचा
पी. सेल्वराज
विश्ववाणी नेटवर्क चेअरमन

दक्षिण पश्चिम सेवाकार्याची वाढ होत आहे

सेवा पदस्थ होण्याचे कार्य १८/४/२०२१ ला लिटन प्रशिक्षण केंद्र, मणीपूर येथे झाले. तेथे ३० नवीन सेवक ३०/४/२०२१ पदस्थ झाले. १५ नवीन सेवक माटीगारा प्रशिक्षण केंद्र, हिमाचल प्रदेश, पदस्थ झाले. परमेश्वराची स्तूती असो या सेवकांनी त्यांचे ३ महीन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले आणि सेवाक्षेत्रात सेवेसाठी त्यांनी प्रवेश केला. पिकाच्या धन्याची स्तूती असो.

LITAN Training Center, Manipur

Matigara Training Center, The Himalayas

प्रार्थनेत गुडघे टेकण्याचे महत्व

प्रार्थना काय आहे?

मनूष्य आपल्या संपूर्ण हृदयाने, मनाने, आत्म्याने आपल्या निर्माणकर्त्याची स्तूती करतो. स्तूती करणे, आज्ञा पालन करणे, त्याच्याकडे पाहणे आणि परमेश्वराबरोबर संभाषण करणे हयाद्वारे मनूष्याची परमेश्वराबरोबर निकटची सहभागिता दर्शविते.

अशा प्रार्थनांना वेळेचे बंधन नाही, मनूष्याच्या शारीरिक भावनांच्या आणि जगाच्या गोंधळाच्या पलीकडे आहेत. प्रार्थनेच्या वेळी या पापी जगात स्वर्गाचा अनूभव येतो. हन्ना चा अर्थ कृपा आहे. परंतू तिला विशेष कृपा मिळाली नव्हती जी तिला तिच्या कौटूंबिक जीवनात हवी होती. अंतःकरणात ती दूःखी होती, बाहेर उपहास होता, तीने काय केले? तीने प्रार्थना केली.

कोणत्या पध्दतीची प्रार्थना ?

तु मला आशिर्वाद दिला नाही तर मी तूला जावू देणार नाही ही त्या एका व्यक्तिची प्रार्थना होती ज्याला फसवणारा असे योग्य नाव दिले होते त्याची प्रार्थना ऐकण्यात आली. त्याने मध्यरात्री आपल्या मित्राचे दार सतत ठोकले आणि तीन भाकरी मागितल्या आणि त्याची विनंती मान्य झाली. हया सर्व प्रार्थना वैयक्तिक आहेत, आणि परमेश्वराच्या समक्षतेत आपली हृदये मोकळी करणाऱ्या आहेत. येशू ख्रिस्ताच्या नावात आपली हृदये सतत मोकळी करा. मागा म्हणजे तूम्हास मिळेल, ठोका म्हणजे उघडले जाईल, शोधा म्हणजे सापडेल हया वचनाचा यथार्थ अर्थ आहे, सतत मागा, सतत ठोका, आणि सतत शोधा.

हन्नाला कृपा मिळाली. तीने ती कृपा परत जिवंत परमेश्वराला दिली. तिचा मूलगा दोष लावता येणार नाही असा न्यायाधिश आणि संदेष्टा होता.

तिच्या प्रार्थनेने हे कार्य केले.

हन्नाप्रमाणे जून्या करारात ८५ व्यक्ती आहेत, ज्यांनी परमेश्वराकडे आक्रोश केला आणि प्रार्थनेत जे त्यांनी मागितले ते त्यांना मिळाले. आज जे रडत आहेत, उसासे टाकत आहेत आणि वैयक्तिक प्रार्थनेत ओरडत आहेत त्यांना कृपा मिळेल.

तूम्ही कोणाच्या नावात प्रार्थना करता?

मनूष्याला सनातन परमेश्वराच्या नावात प्रार्थना करण्यासाठी पाचारण करण्यात आले आहे, जो प्रार्थनेचे उत्तर देतो हा सनातन परमेश्वर कोण आहे? दानीएल ७:९,१० काय सांगितले आहे? मी पाहत असता आसने मांडण्यात आली आणि एक पूराणपूरूष आसनारूढ झाला, त्याचा पेहराव बर्फासारखा पांढरा होता. त्याचे केस स्वच्छ लोकरीसारखे होते, त्याचे आसन प्रत्यक्ष अग्निज्वालामय होते, व त्याच्या आसनाची चाके धगधगीत अग्नीरूप होती, त्याच्या समोरून अग्निप्रवाह वाहत होता. हजारो लोक त्याची सेवा करत होते, लाखो लोक त्याच्या समोर उभे होते. एक मनूष्य जो उपयोगी न पडणाऱ्या धूळीसारखा आहे तो गौरवी आणि पराक्रमी परमेश्वराला कसा पाहू शकतो? जो अशा प्रकाशात वसतो जो कोणी बघू शकत नाही?

जे अंधारात चालत होते त्यांना प्रकाश मिळाला. प्रकाश काय म्हणतो? तो म्हणतो, मी प्रकाश आहे. जर तूम्ही त्या प्रकाशाच्या आश्रयात आला तर तूम्ही त्या सार्वकालिक परमेश्वरामध्ये वस्ती कराल, जो अग्नीमय आहे. तो प्रकाश जो त्याला स्विकारतो त्या प्रत्येक मनूष्याला चमकवतो. हा प्रकाश दूसरा कोणी नाही परंतू येशू ख्रिस्त आहे.

दानीएल ७:१३ मध्ये काय सांगितले आहे?

दानीएल ७:१३– मी रात्रीच्या दृष्टांतात पाहिले तो आकाशातील मेघांवर आरूढ होवून मानव पूत्रासारखा

कोणी आला, तो हया पूराणपूरूषाकडे आला व त्यास त्यांनी त्याच्याजवळ नेले. तो मानवाचा पूत्र माझा तारणारा आहे. प्रत्येकाचा तारणारा आहे तो प्रभू येशू ख्रिस्त आहे. तो म्हणतो, तूम्ही माझ्या नावात जे मागाल ते मी देईल. आपण असे मागू नाही ज्याला मी स्पर्श करील ते सोने होईल कारण, स्वर्गात सोन्याचे गौरव होत नाही. त्या दोघांसारखे नाही, ज्यांना ख्रिस्ताच्या एका एका बाजूला जागा पाहिजे होती कारण, जे सत्तेचे भूकेले आहेत त्यांना कूठेच जागा नाही.

प्रार्थना ही आहे, प्रभू परमेश्वरा मला इच्छेप्रमाणे करण्यास शिकव जो परमेश्वराची इच्छा पूर्ण करतो तो निश्चित स्वर्गाच्या राज्यात जाईल.

परमेश्वराची इच्छा काय आहे?

आपल्यातील एकही लहान व्यक्तीचा नाश व्हावा अशी परमेश्वराची इच्छा नाही. तर परमेश्वराची इच्छा काय आहे? त्याची इच्छा आहे की सर्व मनूष्यांचे तारण व्हावे व त्यांनी सत्याच्या पूर्ण ज्ञानास पोहचावे.- १ तिमथी. २:८ एकाही व्यक्तीचा नाश व्हावा अशी परमेश्वराची इच्छा नाही. परमेश्वराची इच्छा आहे प्रत्येकाचे तारण व्हावे. परमेश्वराची ही महान इच्छा पूर्ण होण्यासाठी येशू ख्रिस्ताच्या नावात प्रार्थना करण्यास सूरूवात करा. सकाळी लवकर उठण्यास शिका. एकांत ठिकाणी जा आणि प्रार्थनेत आपले हृदय परमेश्वरापूढे मोकळे करा. तूमचे सामर्थ्य, तूमच्या पैशात नाही, किंवा तूमचा हूद्या किंवा तूम्हाभोवती असलेले भक्त यामध्ये नाही. तूमचे सामर्थ्य फक्त तूमच्या गूडघ्यात आहे. गाढवे हरवल्यानंतर शौल चिंतेत होता. शमूवेलाने त्यास काय सांगितले? गाढवांची चिंता करू नको, ती सापडली आहेत इस्त्राएलाची चिंता कर.

आत्मे पाण्यासाठी तहानेले झाले आहेत. तेथे पाण्याचा थेंबही नाही जरी जमीनीत कितीही खोल खणले तेथे जिवंत पाणी नाही. फक्त तो एक जो म्हणाला, मला तहान लागली आहे, फक्त तो एकटाच लोकांची तहान तृप्त करू शकतो. त्याची तहान पाण्याची नव्हती परंतू मनूष्यांसाठी होती, जे जगात येथे तेथे पळत आहेत. हो, जे सर्व लोक म्हणत आहेत तूझ्या आत्म्याची तहान फक्त ख्रिस्त तृप्त करील त्यांच्याबद्दल हृदयाने विचार करा.

भारतात प्रत्येक आठवडयाला एक नवीन प्रार्थना मंदीर निर्माण होत आहे, त्या नवीन विश्वासणाऱ्यांसाठी मी आठवडयातून एकवेळ तरी प्रार्थना करील. मी इतर विश्वासणाऱ्यांना जमा करील आणि आम्ही प्रार्थना करू. हे अब्राहामा, मी सदोम आणि गमोरा या शहरांचा नाश करण्यास जात आहे, त्यांचे पाप आकाशापर्यंत पोहचले आहे, म्हणून मी त्यांचा नाश करणार आहे. परमेश्वराने त्यांची ही शिक्षा अब्राहामाकडे उघड केली.

परंतू अब्राहामाने कधीच असे म्हटले नाही. हो, परमेश्वरा कृपा करून तसे कर. ते पापी लोक आहेत, जो लोट माझ्यामूळे संपन्न झाला आणि कोणतीही कृतज्ञता न करता मला सोडून गेला तो तेथे आहे, म्हणून तू त्यांचा नाश कर. त्याऐवजी परमेश्वरा, सदोम शहरात थोडे लोक प्रार्थना करत असतील. गमोरा शहरात १० लोक एकत्र येवून प्रार्थना करत असतील त्यांच्या साठी नाश थांबवणार नाही का? अब्राहामाने हया प्रमाणे परमेश्वराकडे विनंती केली.

ही मोठी प्रार्थना नाही परंतू मूल्यवान प्रार्थना आहे. अशा प्रकारे प्रार्थना करणारे लोक हया जगात दूर्मिळ आहेत. परमेश्वर अशा लोकांना शोधत आहे. माझ्या प्रिय भाऊ बहिर्णींनो, हया दिवसात अशा प्रकारे रडत आणि उसासे टाकून हया देशासाठी प्रार्थना करत असाल तर तूमची प्रार्थना व्यर्थ होणार नाही. एवढेच नाही तर कोणतीही विध्वंसक शक्ती तूमच्या जीवनावर परिणाम करणार नाही.

मेंढपाळ ते राजा- भाग-२

-रेव्ह. प्रकाश गद्रे महाराष्ट्र स्टेट कॉर्डिनेटर

कोणत्याही संदेशात दाविद राजाच नाव घेतल्या वाचून तो संदेश पूर्ण होत नाही प्रत्येक संदेशवाहक हा संदेश देताना दाविद स्तोत्रकर्ता असे म्हणतो हे वाक्य आपल्या संदेशात हमखास म्हणत असतो. ते हयासाठी की संपूर्ण पवित्र शास्त्रात दाविदाचा उल्लेख कूठे ने कूठे तरी आलेला आहे.

१ शमूवेल १६ व्या अध्यायात जरी शमूवेलाने दाविदाचा तेलाभ्यंग केला व त्याला राजा घोषित केले तरी पण दाविद काही ताबोडतोब सिंहासना वर बसला नाही. परंतू एक गोष्ट नक्की झाली आणि ती म्हणजे ज्यावेळेस त्याचा अभिषेक झाला.-

१ शमूवेल १६:१३ त्या दिवसापासून परमेश्वराचा आत्मा दाविदाच्या ठायी जोराने संचरू लागला. त्याचा प्रभाव इतका होता की पूढे जेव्हा शौलामधील परमेश्वराचा आत्मा जाऊन त्यामध्ये दूरात्मा वास करू लागला तेव्हा दाविदाला राज महालात बोलावून आणत असे.

व केवळ दाविद आत्म्याने तंतूवाद्य वाजवत असे तेव्हा तो दूरात्मा शौलामधून निघून जात असे. दाविदाला परमेश्वराचा हा आत्मा एखादया राज्य पदापेक्षा अधिक होता आणि म्हणून दाविदाने बंडखोरी करून किंवा लढाई करून राजपद मिळवल नाही तर अगदी नम्रपणे तो शौलाचा शस्त्रवाहक म्हणून काम करू लागला.

दाविद गल्याथाचा वध करतोः

दाविद आणि गल्याथ ही गोष्ट आम्ही लहानपणापासून ऐकतो, परंतू दाविद खूप शूरवीर होता किंवा मोठा लढवय्या होता, खूप हुशार आणि चतुर होता म्हणून तो गल्याथाला मारण्यासाठी गेला नाही तर गल्याथाला मारण्यामागे एकच कारण होत आणि ते म्हणजे जिवंत देवासंबंधी तो आवेशी होता. गल्याथ हा प्रचंड शक्तीशाली आणि कसलेला योध्दा होता समस्त इस्त्राएल लोकांना त्याने आव्हान केल होत त्याच्याबरोबर लढण्याच तसेच शौलाने त्याला मारण्यासाठी मोठे बक्षिस ही ठेवले होत.

ते म्हणजे जो कोणी त्याला ठार मारील त्यास राजा बहुत धन देवून संपन्न करील व आपली कन्या त्यास देईल, आणि इस्त्राएलात त्याच्या बापाचे घराणे स्वतंत्र करील. १ शमूवेल १६:२५ दाविदाला ना तर धनाची अपेक्षा होती नाही राजाचा जावई बनावयाचे होते.

आणि नाही त्याला त्याचे घराणे स्वतंत्र करायचे होते. आपल्या भावांना जेव्हा तो युध्दभूमीवर खाण्याचे साहित्य घेऊन गेला व जेव्हा ती त्याने त्या पलिष्टयाचे शब्द ऐकले की हया इस्त्राएलाच्या सर्व सैन्यास मी कस्पटासमान लेखीत आहे तेव्हा तो परमेश्वरासंबंधी व त्याच्या सैन्यासंबंधी आवेशी झाला.

पवित्रशास्त्र आम्हाला सांगते की हा गल्याथ ४० दिवस रोज नित्य सकाळी व संध्याकाळी जवळ मैदानात इस्त्राएलाच्या सैन्या समोर उभे राहुन हे बोलत होता परंतू कोणीही जिवंत देवासाठी आवेशी झाले नाही फक्त दाविदाने एकदाच हे शब्द ऐकले व तो त्या जिवंत देवाच्या नामासाठी हा गल्याथा बरोबर लढण्यास तयार झाला शौलाने त्याला युध्दाच्या सूरक्षततेसाठी सर्व प्रकारचे वस्त्र दिले पण त्याने

ते घातले नाही व तसाच तो केवळ काठी व एक गोफन घेऊन बलाढय गल्याथासमोर उभा राहिला व तो गल्याथाला म्हणाला तू तलवार, भाला व बरची घेऊ न मजवर चढून आला आहेस पण इस्त्राएली सैन्याच्या देवाला तू तुच्छ लेखिले आहेस.

त्या सेनाधीश परमेश्वराच्या नामाने मी तूजकडे आलो आहे. आज परमेश्वर तुला माझ्या हाती देईल. मी तूझा वध करीन व तूझे शिर धडापासून वेगळे करीन मी आज पलिष्टि सैनिकांची प्रेते आकाशातील पक्षांस व वनपशुस देईन तेव्हा इस्त्राएलामध्ये देव आहे असे आखिल पृथ्वीस विदित होईल. १ शमू.१६:३५-३६

व असे म्हणून दाविदाने गोफनिने एका दगडात बलाढय गल्याथाला ठार केले.

व धावत जाऊन त्याच्याच तरवारीने त्याचे शिर छेदिले. ४० दिवसापासून इस्त्राएलामध्ये थितीचे वातावरण होते, परंतू दाविदाने ही लढाई जिंकली लोक जयघोष करीत म्हणत होते 'शौलाने हजारो वधले पण दाविदाने लाखो वधले. प्रियांनो आजची परिस्थिती पाहता आमच्या समोर गल्याथासारखे मोठे आव्हान उभे आहे लोक भयभीत आहेत परंतू प्रभू परमेश्वर आज दाविदाच्या शोधात आहे.

ज्याच्याकडे जिवंत देवाचा भरवसा व ते पवित्र नाव आहे. कोणतेही परिस्थिती जरी आमच्या समोर मोठया डोंगराएवढी असली तरी आम्ही त्याच्या आश्वासनावर खंबीरपणे विश्वास ठेऊन उभे राहावे.

आज विश्ववाणी म्हणून आम्ही सुध्दा खंबीरपणे त्या विश्वासावर उभे आहोत की प्रभू सर्व गरजा पूरवेल व तसेच आमच्या सर्व भागिदारांचे ऋणी आहोत की ते प्रत्येक सेवकांची आठवण करतात व पाठपूरावा करतात प्रभू आपणा सर्वांना दाविदासारखे विशाल ऋदय व मोठा विश्वास देवो..... क्रमशः

एक प्रार्थना

हया सिमेपासून त्या सिमेपर्यंत, हया समूद्रापासून त्या समूद्रापर्यंत जे आत्मे वणवण शांती नाही म्हणून भटकत आहेत, ज्याप्रमाणे हन्नाने शमूवेलास वाढविले, कदाचित आमचे डोळे अनेकांना शोधत असतील ज्याप्रमाणे नेहम्याने तट बांधला, चला आपण आपले गूडघे प्रार्थनेत टेकू...

जेव्हा उधळया पूत्र घरी आला पित्याला अत्यानंद झाला, माझ्या द्वारे एक पापी पश्चाताप करत आहे तर स्वर्गात आनंद होतो.

प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात,

आमेन...

कोरोनातून मिळालेली मूक्तता

१) बंधू. सचिन चुधरी- सुकडी जि. गोंदिया.

या ठिकाणी हा बंधू सेवा करत आहे त्याला आणि त्याच्या कूटूंबाला मागील एप्रिल महीन्यात कोविड-१९ ची लागण झाली. प्रभूने त्या सर्वांना कोरोनामूक्त केले. प्रभूची स्तूती असो.

२) बंधू. बी. एन. गेडाम- अमरावती

अमरावती येथे प्रमोशनल सेवाकार्य करत आहे त्यांना कोरोनाची लागण झाली होती. प्रभूने त्यांना उत्तम आरोग्य दिले आहे. म्हणून देवाच्या नावाला धन्यवाद असो.

चला आपण मान लववू आणि गूडघे टेकू

-रेव्ह. इम्मानूएल गॅनराज, प्रेअर नेटवर्क अध्यक्ष

याहो या, परमेश्वर जो आपला उत्पन्नकर्ता त्याच्यापूढे आपण गूडघे टेकू. त्याची भक्ती करू, त्यापूढे नमन करू- स्तोत्र ९५:६

सुवार्ता प्रसार कार्य करण्यासाठी आम्हास गूडघे टेकून प्रार्थना करण्याची गरज आहे. पैसा जे विकत घेवू शकत नाहीत ते प्रार्थनेद्वारे मिळते. कौशल्याद्वारे जे मिळवता येत नाही, ते प्रार्थनेद्वारे मिळवता येते. जेव्हा आपण गूडघे टेकतो, सैतान घाबरतो. हया वचनाद्वारे स्तोत्रकर्ता आपणास गूडघे टेकण्यास आणि प्रार्थना करण्यास आवाहन करतो. जेव्हा आपण हे आवाहन स्विकारतो आणि ही सवय लावून घेतो, तेव्हा आपण सैतानाला आव्हान करतो, चमत्कार घडतील आणि आपण त्याचे साक्षी होऊ.

१. कोणासमोर आपण मान लववतो?

जे मनूष्यासमोर मान लववतात, नम्र होतात ते लज्जित होतील, ते भयभीत आहेत आणि ते स्वतःसाठी जगतात, कारण, त्यांना ख्रिस्त माहीत नाही, म्हणून ते ख्रिस्तापूढे नम्र होऊ शकत नाहीत. ते सतत बदलत असतात. ते पैशासाठी मनूष्यांपूढे झूकतात. त्याचप्रमाणे पदासाठी आणि संरक्षणासाठी झूकतात. हे लोक गोंधळलेले असतात काही लोक सैतानापूढे झूकण्यात गर्व समजतात. सैतान मनूष्यांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी अनेक यूक्त्या करतो. तो मनूष्यांना मोहक गोष्टी दाखवतो आणि त्यांनी अग्नीच्या सरोवरात पाडतो. अज्ञानी मनूष्य त्याच्यापूढे झूकतात.

मत्तय ८ मध्ये आपण वाचतो सैतानाने येशू ख्रिस्ताला मोहात पाडण्याचा प्रयत्न केला. पहिला मोह त्याने येशू ख्रिस्ताला त्याच्या शारीरिक गरजेविषयी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याची भूक भागविण्यासाठी त्याने त्याला मार्ग सांगितला.

दूसरा मोह त्याने प्रतिष्ठा मिळविण्यासाठी घातला. प्रसिध्दी जी गर्व निर्माण करते. तिसरा मोह निर्माण करण्यासाठी मोहात पाडणाऱ्याने त्याला उंच डोंगरावर नेले आणि त्याला जगातील सर्व राज्य आणि त्यांचे वैभव दाखवले आणि त्याला सांगितले, तू मला नमन करशील तर हे सर्व मी तूला देईल. असे आहे तर आपण कोणापूढे नम्र व्हावे?

स्तोत्रकर्ता स्पष्टपणे म्हणतो, या हो या, परमेश्वर जो आपला निर्माणकर्ता त्याजपूढे आपण गूडघे टेकू, त्याची भक्ती करू त्यापूढे नमन करू. स्तोत्र ९५:६ आपल्या शारीरिक गरजांसाठी, उच्च पदासाठी, आणि स्वतःला संतूष्ट करण्यासाठी आपण परमेश्वराचा शोध करू नये. आपण आपल्या उत्पन्नकर्त्यापूढे नम्र झाले पाहिजे.

२. परमेश्वर सर्वसमर्थ आहे

स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मनूष्य इतर मनूष्यांपूढे नम्र होतात. अज्ञानामूळे ते लबाडीच्या बापापूढे नम्र होतात. त्याने हव्वेला फसवले आणि त्याच्या इच्छेप्रमाणे करण्यास तिला प्रोत्साहित केले. आपण परमेश्वरापूढे का नम्र व्हावे? कारण तो आमचा उत्पन्नकर्ता आहे. तो आमचा प्रभू आहे, आपण त्याच्या कूरणातील प्रजा आहोत आपण कळप आहोत तो आपली काळजी घेतो. तो किती महान आहे, हयाची जाणीव आपल्याला झाली तर त्याच्यापूढे नम्र होण्याचे महत्व आपल्याला कळेल. स्तोत्रकर्ता वचन ३-५ मध्ये परमेश्वराच्या महानतेचे वर्णन करतो आणि आपण त्याच्यापूढे नम्र का व्हावे हयाचे कारण सांगतो- कारण परमेश्वर थोर देव आहे, तो थोर राजा आहे, तो सर्व देवांहुन श्रेष्ठ आहे.

त्याच्या हाती पृथ्वीची खोल स्थले आहेत पर्वतांची उंच शिखरेही त्याचीच आहेत. समूद्र त्याचा आहे, त्यानेच तो उत्पन्न केला कोरडी भूमीही त्याच्याच हाताने रचिली गेली. तू येथवरच ये, या पलीकडे तूला येता कामा नये. येथे तूझ्या उन्मत लाटा थांबल्या पाहिजेत. ईयोब- ३८:११ हया वचनात सुध्दा

परमेश्वराचे महानतेचे वर्णन आहे. त्याने समूद्राच्या सीमा ठरवल्या आहेत, त्याने पृथ्वीची सीमा ठरवली आहे. त्याच्या महानतेची जाणीव आपल्याला त्याच्यापूढे नम्र करते.

३. क्षमा करण्यात तो दयाळू आहे

कारण, त्याची दया सनातन आहे. आपण पापी आहोत शिक्षेशिवाय पापांची क्षमा मिळविण्यासाठी आपण त्याच्यापूढे नम्र झाले पाहिजे. असे लिहिले आहे आपण त्याच्या पूत्राचे चुंबन घेतले पाहिजे, नाही तर तो क्रोधीत होईल आणि तूमचे मार्ग तूमच्या नाशास कारण होतील, कारण क्षणात त्याचा क्रोधाग्नी भडकेल. परमेश्वराने त्याच्या एकूलत्या एका पूत्राचा कालवरीवर आपल्या पापांसाठी बळी दिला. जे त्याचा आश्रय करतात ते सर्व धन्य आहेत.

३. तो मदत करण्यास कृपाळू आहे

इब्री ४:१६ मध्ये पवित्र शास्त्र म्हणते, आपल्याला दया प्राप्त व्हावी आणि गरजेच्या वेळी साहाय्य होण्यासाठी कृपा मिळावी, म्हणून आपण धैर्याने कृपेच्या राजासनाजवळ जावू. स्तोत्र. १२१:१-२ मध्ये स्तोत्रकर्ता म्हणतो, मी आपली दृष्टी पर्वतांकडे लावितो, मला साहाय्य कोठून येईल? आकाश आणि पृथ्वीचा निर्माणकर्ता जो परमेश्वर त्याजपासून मला साहाय्य येते. संकटसमयी माझा धावा कर, मी तूला मूक्त करीन, आणि तू माझे गौरव करशील. स्तोत्र ५०:१५

परमेश्वरापूढे नम्र होणे चांगले आहे जो महान आणि अद्भूत गोष्टी करतो. मला हाक मार आणि मी तूला उत्तर देईल, आणि तूला महान आणि तूला माहित नाहीत अशा गहन गोष्टी सांगेल.

४. आपण परमेश्वरापूढे नम्र होतो तेव्हा काय होते?

प्रथम, आपल्या पापांची क्षमा होते तो आपला स्विकार करतो. आणि आपल्याला त्याची मूले होण्याचा अधिकार तो आपल्याला देतो. योहान १:१२ दूसरे- प्रार्थना आम्हाला पवित्र करते आणि विजयी जीवन देते. पाप आणि सैतानावर विजय देते. इब्री. ५:७ मध्ये लिहिले आहे, त्याने आपल्या देहावस्थेच्या दिवसात स्वतःला मरणापासून तारावयास जो शक्तीमान त्याजजवळ मोठया आक्रोशाने व अश्रू गाळीत प्रार्थना व विनवणी केली आणि ती त्याच्या सूभक्तीमूळे ऐकण्यात आली. विजयी जीवनाचे रहस्य प्रार्थनेत आहे. प्रार्थना आम्हाला रोग आणि सैतानाच्या बंधनातून सुध्दा मूक्त करते चला आपण परमेश्वरापूढे नम्र होवू हयासाठी की आम्हास विजयी जीवन प्राप्त व्हावे.

५. जे परमेश्वरासमोर नम्र झाले अशा व्यक्तिंची यादी

महान शलमोन राजाने परमेश्वरापुढे गूडघे टेकले जेव्हा त्याने परमेश्वराच्या मंदीराचे परमेश्वराला समर्पण केले. १ राजे. ८:५४, २ इतिहास ६:१३, एलिया संदेष्टयाने परमेश्वरापुढे गूडघे टेकले आणि पावसा साठी प्रार्थना केली. १ राजे १८:४२ एज्राने गूडघे टेकले आणि त्याच्या लोकांच्या पापक्षमेसाठी प्रार्थना केली. प्रेा ९:५, राजाज्ञेची माहीती असतानाही दानिएल दिवसातून ३ वेळा प्रार्थना करत होता. दानिएल ६:१० एका तरूण पुरूषाने ज्याची सार्वकालिक जीवन मिळवण्याची इच्छा होती प्रभूपूढे गूडघे टेकले. मार्क १०:१७ एक कूष्ठरोगी ज्याची शुध्द होण्याची इच्छा होती येशू ख्रिस्तापूढे गूडघे टेकले. लुक-५:१२ पेत्राने इतर शिष्यांसह गूडघे टेकले आणि प्रार्थना केली. प्रेषित- ९:४०

प्रार्थनेमूळे फक्त विजय मिळतो असे नाही तर ती गर्विष्ठांना सावध करते. पौलाने यशयाने सांगितलेल्या शब्दांना पूष्टी दिली आहे. यशया ४५:२३ मजपूढे प्रत्येक जण गूडघा टेकील, प्रत्येक जिव्हा माझ्याठायी निष्ठेची शपथ वाहील. ख्रिस्तासमोर प्रत्येकजण गूडघा टेकील. मरीबा येथल्याप्रमाणे, रानातील मस्सा प्रकरणाच्या दिवसात केल्याप्रमाणे तुम्ही आपले मन कठीण करू नका. स्तोत्र ९५:८ चला आपण स्वतःला परमेश्वरापूढे नम्र करू.

क्षेत्रीय वार्ता

हयामूळे परमेश्वर तुम्हावर प्रसन्न होण्यास विलंब लावील, तुम्हावर करूणा करावी म्हणून उच्चस्थानी आरूढ होईल, परमेश्वर न्यायी देव आहे, जे त्याची वाट पाहतात ते सर्व धन्य. – यशया ३०:१८

स्तुती आणि प्रार्थना

१. जम्मू काश्मिर:

प्रभूने कागोर गावातील विश्वासणाऱ्यामध्ये लेखराज हया भावाला सहभागी केले. मॉंगती सेवाक्षेत्रात अपस्मार असलेला रॉबीन ला प्रभू येशू ख्रिस्ताने बरे केले. थानोडी येथे प्रार्थना मंदीराचा जमीन खरेदीसाठी तयारी सुरू झाली आहे. प्लासा व कथलती या गावातील अंधकाराची वाईट कामे परमेश्वराने थांबविली परमेश्वराची स्तूती असो. चौकी सेवाक्षेत्रात प्रार्थना मंदीराचा बांधकामासाठी विरोध करणारे लोकांचे अंत:करण बदलून जावे.

२. हिमाचल प्रदेश:

सेवाक्षेत्रात ४ युवा शिबीर घेण्यात आली ६ उपवास प्रार्थना देखील सध्याच्या साथीच्या रोगासाठी करण्यात आल्या. ख्रिस्तामध्ये २० कूटूंबांना नवीन जीवन मिळाले. ४२ गावामध्ये सत्यशोधक सभा घेण्यात आला. सूवार्ता ऐकून येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांबद्दल देवाची स्तूती असो. मदुलाल यांचे अपघातामध्ये कौलर हाड मोडले आहे ते पूर्णपणे बरे व्हावे.

३. पंजाब:

मनदिप सिंग यांनी दारू पिणे सोडले आणि त्यांच्या संपूर्ण कूटूंबाने येशू ख्रिस्ताचा तारणाचा अनुभव घेतला. ९० लोकांनी ख्रिस्तावर आपला नवीन विश्वास जाहीर केला आहे. नवीन सेवाकार्य सुरू करण्यासाठी ५ गावाचा सर्वे करण्यात आला. पंजाबमधील प्रार्थना मंदीराची संख्या १० वर पोहचली आहे. आणि भोगपूर सेवाक्षेत्रात यांची साक्ष देत आहेत.

४. उत्तराखंड

ओईन ग्रामस्थांना सुवार्ता ऐकण्यात खूप आवड आहे. १६ लोकांनी त्यांच्या नवीन विश्वासाची कबूली दिली २१० लोकांनी सत्यशोधक सभेद्वारे प्रभू येशू ख्रिस्ताची सूवार्ता ऐकली मोतीचूर आणि प्रीतित नगर मधील विश्वासणारे आध्यात्मिक रित्या वाढत आहेत. परमेश्वराची स्तूती असो. बहादराबाद येथे नवीन सेवाक्षेत्र उघडण्यासाठी परमेश्वराने यश दयावे.

५. हरियाणा

बामिनीखेरा सेवाक्षेत्रात दोन ठिकाणी बायबल अध्ययन गट सूरू करण्यात आले. ३० लोकांनी त्यांच्या नवीन विश्वासाची कबूली दिली. सत्यशोधक सभेमध्ये सामाजिक अंतर ठेवून ३५ गावात घेण्यात आल्या. आणि २७० लोकांना येशू ख्रिस्तामध्ये नवीन जीवन प्राप्त झाले. कोविड-१९ मूळे त्रस्त आणि रूग्णालये आणि घरामध्ये एकटया राहत असलेल्या लोकांना देवाने बरे करावे. आणि कूटूंबालाही साथीच्या आजारापासून वाचवावे प्रार्थना करा.

७. उत्तरप्रदेश– लखनौ प्रांत

कळूवाजवळील फतेहपूर सेवाक्षेत्रात सुवार्ता कार्याची सुरूवात झाली. पाण्याच्या द्वारे विश्वासाची कबूली देण्यासाठी १० लोक तयार आहेत. माच्छेडिपा आणि माथनापूर या सेवाक्षेत्रातील प्रार्थना मंदीराचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. अहिरनपूरवा आणि नाकार्यात सेवा सूरू करण्याचा प्रयत्नांना परमेश्वर यश देवो प्रार्थना करा. गणेशपूर सेवाक्षेत्रा भक्ती गटाच्या विरोधात येणाऱ्या लोकांचे मन परमेश्वराने बदलावे प्रार्थना करा.

८. झारखंड

उपवास प्रार्थना सभा सामाजिक अंतर ठेवून सुरू ठेवल्या जात आहेत. ४० विश्वासणारे प्रार्थनेसाठी येशूच्या नावाने एकत्र जमतात सेवाकार्यासाठी ५० नवीन एज्रां ऑनलाईन प्रशिक्षण घेत आहेत. भार्नो

सेवाक्षेत्रात जेथे कुरूख लोकांचे वास्तव्य आहे. सत्यशोधकांच्या सभेद्वारे ७० लोकांना येशू ख्रिस्ताला ओळखण्याची संधी मिळाली सिल्डिलिया सेवाक्षेत्रात बहिरा आणि मूका असलेला सहा वर्षाचा मूलगा साकिष आलम याला येशू ख्रिस्ताने स्पर्श करावा.

९. दिल्ली

परमेश्वराने उत्तर भारतीय डायरेक्टर बिशप. रेव्ह. आनंद सिंग यांना कोविड-१९ रोगापासून आरोग्य दिले. आणि रेव्ह. ॲलेक्स मॉरिस यांना शस्त्रक्रियेनंतर आरोग्य दिले. मदानपूर आणि खादर या सेवाक्षेत्रातील विश्वासणारे ऑनलाईन भक्ती करत आहेत. आमची राष्ट्रीय राजधानी दिल्ली साठी साखळी प्रार्थना करण्यात आली. लॉकडावून मध्ये प्रवासी निर्बंध आणि बेरोजगारीमूळे गरीब झालेल्या लोकांच्या समृध्दी साठी प्रार्थना करा.

१०. पश्चिम बंगाल– कूचबिहार जिल्हा

कदमबीनी सेवाक्षेत्रात सामाजिक अंतर ठेवून आयोजित केलेल्या सत्यशोधक सभेद्वारे २० लोकांनी येशू ख्रिस्ताची सूवार्ता ऐकली. कालीमंदीर सेवाक्षेत्रातील शिबम ओराओन यांचे कूटूंब शांतीचे पात्र बनले. सूवार्तेच्या कार्यासाठी हिरामूनी लकरा यांनी आपले घर उघडले देवाची स्तूती असो. गोदामलाईन सेवाक्षेत्रात आयोजित केलेली सत्यशोधक सभा फलदायी ठरली.

११. पश्चिम बंगाल– दार्जिलिंग जिल्हा

बरोधारीया सेवाक्षेत्रामध्ये देवाची सेवा वाढत आहे आणि ज्यूअल तिर्की यांचे कूटूंब सेवेसाठी खूप सहकार्य करत आहे. बॉम्बलाईन आणि साहाबाद मध्ये देवाच्या वचनासाठी दारे उघडल्या जात आहेत आणि नवीन संपर्कासाठी आम्ही देवाची स्तूती करतो. २ नवीन कूटूंबे फूलबारी भक्तीगटात सहभागी झाले देवाची स्तूती असो. फाराबारी सेवाक्षेत्रातील जे लोक परमेश्वरापासून दूर गेले त्यांना ख्रिस्तामध्ये नवीन जीवन प्राप्त व्हावे.

१२. आसाम

४ लोकांनी येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला. कूमारबारी सेवाक्षेत्रात देवाने नवीन १० तरूण भक्तीगटात सामील केले देवाची स्तूती असो. ससालपाडा सेवाक्षेत्रातील लखींदर यांचा बिछाना देवाने बदलावा यासाठी प्रार्थना करा. बंडपागूरी आणि बारंगाबाडीमध्ये देवाचे लोक वाढत आहेत. सोमाजूरी राहणारा मनोज राभा याला रक्त कर्करोग आहे, प्रार्थना करा मोईनमाता आणि मकरी सेवाक्षेत्रातील आयोजित केलेली सत्यशोधक सभा फलदायी ठरली.

१३. ओडिसा– हो संताली प्रांत

आजारी लोकांना मदत करण्यासाठी देव सत्य ज्योतीचा अद्भूत उपयोग करत आहेत. परमेश्वराच्या योजनेनूसार फूलबहाली प्रार्थना इमारत प्रगती पथावर आहे. भांदूबेदा आणि मूगुरमोरा सेवाक्षेत्रात विश्वासणाऱ्यांची संख्या वाढत आहे. मंगलसिंग समदला देवाने चमत्कारिकरित्या आजारातून उठवले देवाच्या नावाला धन्यवाद बोडपूक्ता गावामध्ये सूवार्तेला विरोध करणाऱ्या लोकांचे मन परिवर्तन करावे. कोविड-१९ मूळे एकाकी करण केलेल्या लोकांना देवाने बरे करावे.

१४. ओडिसा– कंधमाल जिल्हा

सिपाजे सेवाक्षेत्रातील ८ विश्वासणारे विश्वासात बळकट होत आहे. रजिकाखोल गावातील ललिता दिगल यांचे कूटूंबीय विश्वासणाऱ्यामध्ये समूहात सामील झाले आहेत कारण त्यांना देवाने बाळ देवून आशिर्वादित केले. कबूली देण्यास तयार आहे. आजारापासून परमेश्वराने वाचवावे यासाठी प्रार्थना करा.

१५. ओडिसा– रायगड जिल्हा

अंबोकूला आणि पेरपंगा येथे बायबल अभ्यासाचे गट तयार केले गेले आहे. ६ लोकांनी प्रभू येशूवर विश्वास ठेवला अदमूंडा गावातील लोक मनापासून देवाचे वचन ऐकतात करूंडी आणि डेमोगूडा हया सेवाक्षेत्रात सांगितलेली सुवार्ता फलदायी ठरली आहे. आणि नवीन संपर्क मिळाले आहेत देवाची स्तूती

असो. रोजची मजूरी करणारे आणि लहान उदयोग करणारे कूटूंब आपल्या उदरनिर्वाहासाठी संघर्ष करीत आहेत.

१६. ओडिसा– संबलपूरी प्रांत

आम्ही मानपूर सेवाक्षेत्रातील लोकांबद्दल देवाची स्तूती करतो की त्यांनी संकटामध्ये येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला आहे. २ नवीन कूटूंब तलपाडा भक्ती गटामध्ये येत आहेत. प्रभू येशूने प्रशांतला सैतानाच्या तावडीतून सोडविले. लादेरपाळी येथे केलेली सेवा फलदायी ठरावी. रश्मिताईच्या कूटूंबाला परमेश्वराने बाळ देवून आशिर्वादीत करावे यासाठी प्रार्थना करा.

१७. छत्तीसगढ– चांपा प्रांत

सलीहाभाटा सेवाक्षेत्रात सूवार्ता कार्याला होणारा विरोध देवाने थांबवावा. ५ नवीन लोकांनी प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला. प्रभूची स्तूती असो परमेश्वराच्या कृपेने २ बायबल अध्ययन वर्ग सूरू करण्यात आले आहे. तरोड सेवाक्षेत्रातले विरोध परमेश्वराने दूर केला आणि सूवार्तेसाठी दार उघडले आहे. मूर्तीकार आणि कोट्रीपाणी येथे भक्तीगट सूरू करण्याचा प्रयत्न करत आहेत.

१८. सिक्कीम

शामडोनग व तूमिन या सेवाक्षेत्रातील ६ बंधूनी प्रभू येशू ख्रिस्तामध्ये कबूली दिली. परमेश्वराने आणखी तीन आत्म्यांना विश्वासी संगतीमध्ये आणले. परमेश्वराने सेवाकार्यातील दासोना प्रार्थना सभा सामाजिक अंतर ठेवून व भेटण्यास व बिमार व्यक्तीस प्रार्थना करण्यास मदत केली. अनेक लोकांनी देवाचे वचन ऐकले आणि देवात कोपाची मध्ये वाढत आहेत देवाची स्तूती असो. रिम्बी प्रार्थनामध्ये विश्वासणाऱ्यांची दररोज वाढ होत आहेत. परमेश्वर भिका रसूला यांच्या कूटूंबात संतान चे दान देवून आशिर्वादित करावे.

१९. गूजरात

परमेश्वराने ८ सेवकांच्या कूटूबियांना आरोग्य दिले. आणि हिनडला या गावांनी विश्वासू लोकांना भयेच्या मृत्यूछायेतून परमेश्वराने वाचवले. सेवक अंबादास यांना जीवन प्राप्ती परमेश्वराने दयावे. १० लोकांना प्रार्थना मंदीर वडील मंडळींना व अर्निल्या बंधूच्या कूटूंबाला परमेश्वराने खाटेवरून उठवून परमेश्वराचे साक्षीदार बनविले. परमेश्वराचे स्तूती असो. गावातील लोक लॉकडावूनच्या अगोदर साखर कारखान्याला कामाला गेलेले आहेत, परमेश्वर सर्वांना सूखरूप परत आणावे म्हणून प्रार्थना करा.

२०. मणिपूर

उकरूल जिल्हयात परमेश्वराने ६ सेवक पाठविण्यास मदत केली. सत्यशोधक सभेमध्ये १९१२ एकत्र जमले या कीतन या सेवाक्षेत्रात महाआज्ञा सेवांची सभा कनडेक्टेट केली. व १५ नवीन सेवाक्षेत्रात सुरू केले. देवाची स्तूती असो. ९६ लोकांनी प्रभू येशू ख्रिस्तामध्ये विश्वासाची कबूल दिली. त्यांच्यासाठी प्रार्थना करा. प्रशिक्षण केंद्र सूरू करण्यासाठी योग्य जमीन मिळावी आणि कोविड पासून परमेश्वराने गावातील लोकांचे संरक्षण करावे म्हणून प्रार्थना करा.

त्रिपूरा

१७ व्यक्तीने येशू ख्रिस्तामध्ये विश्वासाची कबूली दिली. परमेश्वराचे लोक सामाजिक अंतर ठेवून कोया गावात एकत्र केले. प्रार्थना करा पुर्ण पणे कोविड निघून जावे, देबारमा या जादूगाराला सूवार्ता सांगितली आहे तो विश्वासात वाढत आहेत. परमेश्वराची स्तूती असो. संकेत राय याने सेवाकार्यासाठी उभे राहावे. सिकारपारा येथील नवीन लोकांनी सुवार्ता ऐकली त्यांचे तारण व्हावे.

२१. महाराष्ट्र

खाटाडांबा या सेवाक्षेत्रामध्ये पवित्र आत्म्याच्या कार्याची साक्षी व्हावे. लोकांमध्ये आराधना गटामध्ये सहभागी होण्याची आवड निर्माण झाली आहे. २५ लोकांनी येशु ख्रिस्ताच्या नावात विश्वासाची कबूली दिली. मेनकी या सेवाक्षेत्रात सूवार्ता ऐकण्याची उत्सूकता वाढली आहे. परमेश्वराने सेवक स्वप्नील उंदीरवाडे च्या कूटूंबाला संतानप्राप्तीचा आशिर्वाद दिला. ज्या कूटूंबातील प्रियजन कोरोनामूळे दगावले आहेत अशा कूटूंबांच्या दैनंदीन गरजा परमेश्वराने पुर्ण कराव्या.

२२. आंध्र प्रदेश– तेलगु प्रांत

२८ लोकांनी प्रभू येशु ख्रिस्ताला त्यांच्या वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकारले आणि येशू ख्रिस्ताच्या नावात विश्वासाची कबूली दिली आहे. जोगीपाडू आणि चीडीमिडी या सेवाक्षेत्रात वचनाची सेवा करण्यात आली आहे. ४५ नवीन लोकांनी देवाच्या वचनासाठी रूची दाखविली आहे. परमेश्वराने वंगारा मंडल या सेवाक्षेत्रात सेवेसाठी नवीन दार उघडले आहेत. व ४ व्यक्तीचे जीवन परमेश्वराच्या वचनाने व सूवार्तेने वाचविले गेले आहे.

२३. मध्य प्रदेश

बंधू. सतीष यांच्या कूटूंबाला दुष्ट आत्म्या त्रास देत आहे त्यांना त्यापासून सूटका मिळावी. सेवक रामकुमार यांनी विश्वास कबुली ची सभा आयोजित केली त्यामध्ये ५ व्यक्तीने येशू ख्रिस्ताला तारणारा म्हणून स्विकार केला. नेत्राम आणि सूनील यांच्या साक्षीद्वारे शेजारचे लोक विश्वासात वाढत आहेत. हजारी हा मानसिक आजारात आहे त्याला प्रभू येशू ख्रिस्ताच्या स्पर्शाची गरज आहे. सूरज यांच्या कूटूंबाची गरिबीतून सूटका व्हावी.

२४. तेलंगणा

१५ लोकांनी प्रभू येशू ख्रिस्तामध्ये विश्वासाची कबूली दिली. फिल्ड सर्वे द्वारे २४ नवीन गावे सेवाकार्याकरिता ओळखण्यात आले आहे. ६ सेवक कोविड-१९ पासून पूर्णपणे बरे झाले. मामिलागूडेम आणि चेन्नामपली या गावामध्ये प्रार्थना मंदीर बांधण्यासाठी जागा घेण्यात आली आहे. चारागोंडा मंडल या सेवाक्षेत्रातील सेवक सेवाकार्य सुरू करण्यासाठी खूप परिश्रम घेत आहेत. इंडानपल्ली येथील सेवाकार्य फलदायी व्हावे.

२५. आंध्र प्रदेश– श्रिकाकूलम सोरा प्रांत

वंकयालगेडा येथे बायबल अध्ययन गटाची सुरूवात झाली. वेन्नेलावालसा येथील प्रार्थना मंदीराच्या समर्पणाद्वारे देवाचे गौरव झाले. भूमीकाकूडा गावकऱ्यांसाठी १५ घरे बांधण्यात आली कारण त्यांची घरे हत्तींनी उध्दवस्त केले होते. बूथलगूडा येथे सेवाकार्याला सुरूवात झाली आहे. बटीगूडा येथे बायबल अध्ययन सूरू करण्यासाठी घेण्यात आलेले परिश्रमाला यश यावे.

२६.कर्नाटक

मूथागेरे गावातील गंगाधर हा दारूच्या व्यसनातून मूक्त व्हावा. ११ लोकांनी प्रभू येशू ख्रिस्तामध्ये त्यांच्या विश्वासाची कबूली दिली. बूलापारा येथील राधा चे कूटूंब जे सेवेच्या विरोधात होते ते सुवार्तेचे द्वारे परिवर्तित झाले आहे. चिका चेलुरू येथे देवाच्या वचनाकरीता दार उघडण्यात आले आहे. रामांजी यांना पॅरेलिसिस च्या आजारातून सूटका मिळावी. अवुलाना येथील प्रार्थना मंदीराचे बांधकाम लवकर पूर्ण व्हावे. अरानेकूलू गावातील लोकांनी देवाचे वचन ऐकले आहे, त्यांचे परिवर्तन व्हावे यासाठी प्रार्थना करा.

२७. उत्तर प्रदेश– भोजपूरी प्रांत

१३ विशेष सभा ऑनलाईन द्वारे आयोजित करण्यात आल्या १३४ लोकांनी त्याद्वारे सामर्थ्य मिळाले.५५ नवीन गावे सेवाकार्यासाठी ओळखण्यात आली आहेत. २९ लोकांनी प्रभू येशू ख्रिस्तामध्ये त्यांचा विश्वास जाहीर केला. सेवक शिव शेखर हा कोविड-१९ पासून पूर्ण बरा झाला आहे.

२८. पश्चिम बंगाल– कोलकत्ता प्रांत

९ नवीन लोकांनी त्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे त्यांना गावातील सेवाकार्यासाठी रूजू केले आहे. ५ लोकांनी प्रभू ख्रिस्तामध्ये त्यांच्या विश्वासाची कबूली दिली. जाकोब तूडू आणि इलू यांना प्रभूने कोविड-१९ पासून वाचवले. गोपीनाथपूर आणि कमरपूर येथील लोकांचे हृदय देवाच्या वचनाद्वारे परिवर्तीत व्हावे. रेरीपूर आणि केदार सेवाक्षेत्रातील विश्वासणाऱ्यांची आध्यात्मिक वाढ होण्यासाठी प्रार्थना करा.

आपणासमोर एक मोठी संधी
पूर्णविळ सेवकांची वैदयकीय काळजी घेण्यासाठी
मदतीची गरज आहे.

विश्ववाणी मध्ये जे पूर्णवेळ सेवक कार्य करतात ते सर्व स्थानिक सेवक असतात. १००% सेवक हे त्या राज्यातील व त्या लोकगटातील असतात ते आपल्या लोकांमध्ये त्यांच्या भाषेत व त्यांच्या संस्कृती मध्ये सेवाकार्य करत असतात. विश्ववाणी ही एक संस्था म्हणून १९८५ मध्ये तिची सरकारी दप्तरमध्ये नोंद करण्यात आली. तेव्हा ४२ सेवक पूर्णवेळ कार्य करत होते. आज भारतात ४२१५ पूर्णवेळ सेवक आपआपल्या भाषेत सुवार्तेचे कार्य करत आहेत.

हंगामाचा धनी आज आमच्या अपेक्षेपेक्षा ही जास्त आम्हाला देत आहे की आम्ही खेडोपाडयात सेवा घेऊ न जावे हे केवळ त्याच्या सामर्थ्याने तो आमच्याद्वारे हे कार्य करून घेत आहे.

स्वर्गीय पिता हे सर्व आश्चर्यकारक रित्या सूव्यवस्थितपणे सुवार्तेच्या कार्याची मांडणी विश्ववाणी च्या द्वारे सेवा क्षेत्रात करत आहे आम्ही सामाजिक कार्य करण्यासाठी विश्ववाणी मध्येच अजून एक पूरक संस्थेची नोंद सरकारी कार्यालयात १९९४ रोजी केली ज्याचे नाव आम्ही विश्वासी संगती असे ठेवले आहे. हया संस्थेद्वारे वेगवेगळया प्रकारचे सामाजिक कार्य राबवल्या जाते. जसे मूलामूलींची वस्तीग्रहे, लहान प्रमाणात उदयोग, स्वंयरोजगार, शिक्षण, आरोग्य स्वच्छ पाणीपूरवठा आपतकालीन योजना इ. अनेक दिवसापासून आम्ही प्रार्थना करत होतो आणि विचार विनिमय करत होतो की दूर्गम खेडयात जेथे आमचे सेवक काम करत आहेत त्यांच्या कूटूंबासाठी वैदयकीय मदत कशाप्रकारे आम्हाला पूरवता येईल.

आम्ही एक दीर्घकालीन योजना तयार केली की जे सेवक सेवेत असताना मरण पावतात त्यांच्या विधवा पत्नीला दीर्घ काळ मदत देता यावी.

कारण येणाऱ्या दिवसात आम्हाला २०,००० सेवक सेवेमध्ये घ्यायचे आहेत. आणि म्हणून आम्ही अगदी विश्वासाने हा निर्णय घेतला तसेच विश्ववाणी बोर्ड हयांची परवानगी व मान्यता घेऊन काळजी आणि गरजूंसाठी संस्था (Society for care and Needy) ही एक पूरक संस्थेची नोंद सरकारी कार्यालयात केली. हे एक विश्ववाणीचे पूरक अंग असून हया संस्थेद्वारे आम्ही खेडयातील सेवकांना वेळेमध्ये लागणारी तातडीची वैदयकीय मदत पूरवू शकू तसेच अपातकालीन मदत, अपघात कालीन मदत, आजारपण हया सेवा आम्ही पूरवू शकू.

कृपया आपण हया सेवेमध्ये आपला सहभाग देऊन हया मध्ये बाधित झालेल्या सेवकांना मदतीचा हातभार लावू शकतात. कृपया खाली दिलेल्या बँक खात्यामध्ये आपण आपली मदत पाठवू शकता व योग्य ती पावती मिळवू शकता.

A/C Name: **SOCIETY FOR CARE AND NEEDY**
Bank: **STATE BANK OF INDIA**
A/C No.: **40170 153 077**
IFSC Code: **SBIN0017247**

Branch: **Korattur, Chennai**
Branch Code: **17247**

Please update us with your transaction detail
to acknowledge with receipt ✆ 9 444 455 646

RNI REGD. NO. RN. 45017/89 I POSTAL REGD. NO. HQ/SD/206/2021-2013 - MARATHI DATE OF PUBLICATION 23.05.2021
LICENSED TO POST WITHOUT PREPAYMENT - PMG/TS/HQR/SC-02/WPP/2021-2023

पृथ्वीच्या सर्व सीमांनो, मजकडे वळा, उध्दार पावा, कारण मी देव आहे, अन्य कोणी नव्हे. मी आपली शपथ वाहिली आहे, माझ्या न्यायत्वाच्या मूखांतून वचन निघाले आहे, ते बदलणार नाही, ते हे की मजपूढे प्रत्येक जण गूडघा टेकील, प्रत्येक जिव्हा माझ्या ठायी निष्ठेची शपथ वाहील.

– यशया ४५:२२–२३

त्यांनी येशूला पाहिले आणि त्यांचे तारण झाले

TAIPOO - 7, WEST BENGAL - 04.04.21

VENNELAVALASA, A.P - 05.04.21

NERUDUVALASA COLONY, A.P - 04.04.21

CHINAGEESADA, A.P - 18.04.21

BHOGPUR PUNJAB - 25 04 21

VISHWA VANI SAMARPAN - MARATHI LANGUAGE
Printed and Published by P. Selvaraj on behalf of VISHWA VANI, a registered society (Regn. No.17871 of 1987 and printed at CAXTON Offset Pvt. Ltd., 11-5-416/3, Red Hills, HYD-04. and published at 1-10-28/247, Anandapuram, ECIL Post, HYD-62. EDITOR: P. SELVARAJ. POSTING DATE: 26.05.2021